महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२३/ 495
दिनांक : /०१/२०२३ 30 JAN 2023

**प्रति,**
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने College Connect उपक्रमांव्दारे प्रसिध्दी करणेबाबत.**

**संदर्भ :** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २अ/एनडीएम/कॉलेज कनेक्ट /२०२३-२४/२अ दि.०६.०१.२०२३

गेल्या काही शैक्षणिक वर्षापासून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी स्कुल कनेक्ट या उपक्रमांतर्गत समुपदेशन सभा,जनजागृती मोहिम इत्यादी कार्यक्रमांव्दारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची आणि पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याची योजना राबविली. परिणामी शै.वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमांची असलेली ४१ टक्क्यांची प्रवेशसंख्या प्रतिवर्षी वाढ नोंदवत शै.वर्ष २०२२-२३ मध्ये ८५ टक्के इतकी झाली हे निश्चितच कौतुकास्पद आणि दखलपात्र ठरले आहे.

स्कुल कनेक्ट अपक्रमासारखा अभिनव उपक्रम राबवून तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्साक्रमांच्या अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्याकडून प्रवेशास प्राधान्य मिळावे व परिणामी या अभ्यासक्रमांमध्ये रिक्त राहत असलेल्या जागा कमीत कमी राहाव्यात यासाठी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण व मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक संस्थेच्या प्राचार्य/संचालकांनी पुढाकार घेऊन, संस्थेतील अध्यापकांच्या सहहाकार्याने प्रयत्न करुणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी **" कॉलेज कनेक्ट"** हा उपक्रम संदर्भीय पत्रामध्ये दिलेल्या सुचनेचे अवलोकन करुन राबविण्यात यावा. (सुलभ संदर्भाकरीता संदर्भिय पत्र सोबत जोडण्यात येत आहे.)

(मा.रा.जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०/४६५, ४४७

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २अ/एडीएम/कॉलेज कनेक्ट/२०२३-२४/23 दिनांक 6 JAN 2023

प्रति,

१. प्राचार्य/संचालक
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानीत व
विनाअनुदानित संस्था

२. संचालक,
विद्यापीठ संचालित पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने College Connect उपक्रमांव्दारे प्रसिध्दी करणेबाबत...**

गेल्या काही शैक्षणिक वर्षापासून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी स्कुल कनेक्ट या उपक्रमांतर्गत समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम इत्यादी कार्यक्रमांद्वारे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची आणि पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याची योजना राबविली. परिणामी शै.वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमांची असलेली ४१ टक्क्यांची प्रवेशसंख्या प्रतिवर्षी वाढ नोंदवत शै.वर्ष २०२२-२३ मध्ये ८५ टक्के इतकी झाली हे निश्चितच कौतुकास्पद आणि दखलपात्र ठरले आहे.

स्कुल कनेक्ट उपक्रमासारखा अभिनव उपक्रम राबवून तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांकडून प्रवेशास प्राधान्य मिळावे व परिणामी या अभ्यासक्रमांमध्ये रिक्त राहत असलेल्या जागा कमीत कमी राहाव्यात यासाठी मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक संस्थेच्या प्राचार्य / संचालकांनी पुढाकार घेऊन, संस्थेतील अध्यापकांच्या सहकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी "कॉलेज कनेक्ट" हा उपक्रम दि.९.१.२०२३ पासून सुरु करण्यात यावा. सदर "कॉलेज कनेक्ट" उपक्रमांतर्गत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता संभाव्य विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी करीअर फेअरचे/मेळाव्यांचे आयोजन करावे. त्यामध्ये मुख्यत्वे करुन अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी व पदवी अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या संधी याबाबत विविध माध्यमांव्दारे जनजागृती करावी. व्यावसायिक अभ्यासक्रमांबद्दल पालकांनाही अवगत केल्यास त्यांचेकडून पाल्यास व्यावसायिक तांत्रिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पोषक विचार तयार होऊन पाल्यास या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहन मिळू शकते. त्यामुळे सदर कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या पालकांनासुद्धा निमंत्रित करावे. उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांची माहिती संकलित करावी. विद्यार्थी व पालकांना समजतील असे विषय करीअर फेयर /मेळाव्यात ठेवून, त्याप्रकारे रचना करून कार्यक्रम आयोजित करावा.

२. परिसरातील उच्च माध्यमिक संस्था आणि महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन कॉलेज कनेक्ट उपक्रम विद्यार्थी व पालकांसाठी राबविण्यात यावा व यामध्ये अभियांत्रिकी शाखेतील संधींची माहिती विदयार्थी व पालकांना देण्यात यावी.

३. संबंधित भागातील शासकीय **यंत्रणांचे प्रमुख,** कॉलेजचे प्राचार्य तसेच कॉलेजमधील मोजके शिक्षक यांच्या एकत्रित सभा संबंधित तांत्रिक **पदवी अभ्यासक्रमांच्या** संचालक/ प्राचार्यांमार्फत (Online/Offline) आयोजित करुन पदवी अभ्यासक्रमांच्या **प्रवेशाबाबत** जनजागृती करण्यात यावी. तंत्र शिक्षणातील विविध संधीची त्यांना कल्पना देऊन वेगाने होत **असलेल्या** बदलांचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य कसे उज्वल होईल हे विद्यार्थी व पालकांच्या तसेच नामांकित उच्च माध्यमिक संस्था/महाविद्यालयांचे प्राचार्य व त्यामधील अध्यापक यांच्या नजरेस प्राधान्याने आणून द्यावे.

४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये होत असलेल्या बदलांची माहिती विद्यार्थी आणि पालकांना देण्यात यावी. या धोरणाच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एआयसीटीई), अखिल भारतीय भेषजी परिषद (पीसीआय), कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर (सीओए) इत्यादी शिखर परिषदांनी अंगिकारलेल्या धोरणांचीही कल्पना विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

५. पदवी अभ्यासक्रमांच्या संचालक/प्राचार्यांमार्फत, परिसरातील उच्च माध्यमिक संस्था/कॉलेजच्या प्राचार्यांच्या भेटीची वेळ निश्चित करणे, पदवी संस्थेचे सादरीकरण (PPT) करणे, पत्रके वाटणे, संस्था/कॉलेजमधील विद्यार्थ्यांची पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये भेट आयोजित करणे, त्यांना पदवी संस्थांमधील लॅब, क्लासरूम, प्रोजेक्ट, विस्तृत परिसर, प्लेसमेंट दाखवणे, शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घडविणे, गावोगावी जाऊन करिअर फेअर आयोजन करणे, इत्यादीबाबत कार्यवाही करावी.

६. विविध पदवी अभ्यासक्रम, पात्रता, प्रवेशनियमावली, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यांची थोडक्यात माहिती द्यावी.

७. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची कार्यपध्दती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर कशा प्रकारे करण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

८. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होण्याचा साधारण कालावधी, त्यासाठी लागणारी कागदपत्रे इत्यादीची माहिती देण्यात यावी. आवश्यकतेनुसार हे अर्ज भरण्यासाठी संस्थेमध्ये मदत कक्ष उपलब्ध करुन देण्याची योजना तयार करावी.

९. प्रवेश अर्ज भरणे, अर्ज निश्चिती करणे, गुणवत्ता यादी मधील त्रुटी दुरुस्त करणे, अंतिम गुणवत्ता यादी तपासणे, विकल्प सादर करणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, जागावाटप केलेल्या संस्थेत प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घेणे इत्यादी पदवी प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत बाबींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

१०. उच्च माध्यमिक शाळा/कॉलेजेसमध्ये पदवी अभ्यासक्रमांच्या विविध शाखांचे सादरीकरण, विदयार्थ्यांच्या placement बाबतची माहिती, प्रसिद्ध माजी विद्यार्थी / उद्योजक यांची विद्यार्थ्यांशी अनौपचारिक चर्चा, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

११. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले जाते. इन्फोसिस, नॅसकॉम या सारख्या नामवंत कंपन्यांसोबत संचालनालयाकडून सामंजस्य करार करण्यात आले आहेत त्यासंबंधीची माहिती विद्यार्थी व पालकांना सांगण्यात यावी.

१२. कॉलेज कनेक्ट उपक्रम राबविताना, संस्थेतील/महाविद्यालयांतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत तसेच त्यांच्या पालकासबंधित माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करण्यात यावी. पदवी प्रवेशासाठी स्वारस्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट करण्यात यावी व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मोबाईल क्रमांकाचा सुध्दा त्यामध्ये समावेश करण्यात यावा.

१३. कॉलेज कनेक्ट उपक्रम राबविला जात असताना आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना Admission Process ची माहिती डिजीटल फॉरमॅटमध्ये उपलब्ध करुन द्यावी.

१४. महाविद्यालयांमधील अध्यापकांनी पदवी अभ्यासक्रमांसाठी तयार केलेले E-content, तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध आधुनिक शिक्षण अध्यापनशास्त्रांचा (Teaching Pedagogy) या बद्दलची माहिती देण्यात यावी.

१५. शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या विषयी माहिती देऊन तंत्र शिक्षण कमी खर्चात पूर्ण करून रोजगारक्षम तसेच उद्यमशील उद्योजक कसे बनता येईल यासंबंधी विस्तृत माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

सदर विद्यार्थ्यांच्या बारावीच्या परिक्षेनंतर व विद्यार्थ्यांचा या अभ्यासक्रमांचा निकाल लागल्यानंतरसुध्दा सदर प्रक्रीया सुरु ठेवण्यात यावी. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी परिसरातील विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे समुपदेशन करावे, तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना पदवी प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, प्रवेश सुविधा केंद्रांबाबत माहिती द्यावी व तंत्रशिक्षणासंबंधी नोकरी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन सुध्दा करावे. पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशसंख्या वाढविण्याच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रमाद्वारे याबाबतचा प्रसार व प्रचार करण्यात यावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत: १. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मुंबई-४०००३२, यांना माहितीसाठी सादर.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व कार्यवाहीकरीता. त्यांना कळविण्यात येते की, सदर योजनेची आपल्या विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संस्थांना मार्गदर्शन करावे व यासंबंधीचा पाठपुरावा करुन वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

३. माहिती तंत्रज्ञान कक्ष (कार्यासन क्रमांक ३) मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, कॉलेज कनेक्ट उपक्रमाअंतर्गत संस्थांनी संकलीत केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती डेटाबेसच्या स्वरुपात जमा करण्यासाठी MSBTE ने विकसित केलेल्या स्कुल कनेक्ट उपक्रमाच्या माहिती संकलनाच्या धर्तीवर ऑनलाईन प्रणाली आवश्यक त्या बदलांसह विकसित करुन कार्यान्वीत करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करावी. सदर उपक्रमासाठी संस्थांनी तारीखनिहाय भरलेल्या माहितीचा गोषवारा सदर प्रणालीमध्ये योग्य त्या तक्त्यात (Report) पाहण्याची सुविधा उपलब्ध करण्यात यावी.